नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २८/०३/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत १४ कि. मी. अंतरावरील मौजा माहुरझरी रोड वरील शेख यांचे शेतात येथे दिनांक २७/०३/२०२२ चे ११.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– लिलाधर भाऊराव राऊत, वय ३० वर्ष, रा. ब्राम्हणवाडा ता. जि. नागपुर यांचा चुलतभाऊ असलेला जखमी नामे– दिनेश मधुकर राऊत, वय ३१ वर्ष, रा. ब्राम्हणवाडा ता. जि. नागपुर हा मागील ५ ते ६ दिवसापासुन आरोपी नामे– राजेश राजकुमार यादव, वय २७ वर्ष, रा. माहुरझरी रोडवरील गुप्ता यांचा बंगला ताजी नागपुर याच्याकडे बांधकामावर मीस्त्री काम करीत होता. सचिन ज्ञानेश्वर वाघ रा. ब्राम्हणवाडा याने फिर्यादीस माहीती दिली की, दिनेशला कोणीतरी मारहाण केल्याने तो जखमी अवस्थेत माहुरझरी रोडवरील शेख यांच्या शेतात पडला आहे. फिर्यादी याने यातील घटनास्थळावर जावुन ॲम्बुलन्सने जखमीस मेयो हॉस्पीटल नागपुर येथे उपचारकामी घेवुन जात असतांना जखमीने ॲम्बुलन्समध्ये फिर्यादीस सांगीतले की, यातील आरोपीने दिनेश हा काम करीत नाही म्हणुन दगडाने ४ ते ५ वेळा माराहाण करून जिवे मारण्याचा प्रयत्न केला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री शिवाजी विक्रम मुंडे मो.क्र. ९४०३९५१२३६ हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत ११ कि. मी. अंतरावरील मौजा गुंढरी पंडे येथे दिनांक २७/०३/२२ चे ०७.०० वा. ते १३.३० वा. चे सुमारास फिर्यादी नामे– किसना सिताराम सांगोळे वय ४८ वर्ष रा. गुंढरी पंडे हे घराचे दार उघडे ठेवून शेतावर कामाला गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे आत प्रवेश करून लोखंडी आलमारी उघडून आतमध्ये ठेवलेल्या पर्समधुन सोन्याचे दागिने असा एकुण कि. ३४,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रविंद्र बर्वे मो.क्र ८८३०५६५०७६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर